पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक: ०१/०५/२०२०**

## गडचिरोली पोलीस दलाने वाहिली शहीद जवानांना श्रध्दांजली

**=> वीरांचे बलिदांन व्यर्थ जाऊ देणार नाही. मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे**

दिनांक ०१ मे २०२१९ रोजी गडचिरोली जिल्ह्यातील जांभुळखेडा नजिक नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्यात गडचिरोली पोलीस दलाचे १५ जवान शहीद झाले होते. या निमित्ताने आज गडचिरोली पोलीस दलाने या वीर बहादूर जवानांचे स्मरण करत गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलविरोधी लढ्यात शहीद झालेल्या सर्व जवानांना मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़े., मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. मोहितकुमार गर्ग सा़े., मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल सा़े., मा. सहायक पोलीस अधीक्षक श्री. मुमक्का सुदर्शन सा़े., मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. भाऊसाहेब ढोले सा़े. यांनी पुष्पचक्र अर्पण करत श्रध्दांजली वाहीली. यावेळी मोजकेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़े. यांनी नक्षलवाद्यांच्या भ्याड हल्यात शहीद झालेल्या जवानांचे स्मरण करत गेल्या वर्षभरात गडचिरोली पोलीस दलाने नक्षलविरोधी मोहीम यशस्वीपणे पार पाडत नक्षलवाद्यांवर वचक ठेवण्यात व त्यांना नामोहरम करण्यात यश प्राप्त केल्याचे सांगितले. त्याचबरोबर गडचिरोली पोलीस दलाच्या शहीद बहादुर जवानांचे बलिदान व्यर्थ जाऊ न देता या जिल्ह्यातून नक्षलवादाला हद्दपार करण्यासाठी गडचिरोली पोलीस दल कटिबध्द असल्याचे म्हंटले.

यानंतर मा. पोलीस अधीक्षक, श्री. शैलेश बलकवडे सा़े. व मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल सा़े. यांनी शहीद जवानांच्या घरी जावुन जवानांच्या कुटुंबियांची भेट घेत त्यांच्याशी संवाद साधला. गडचिरोली नजिक मौजा चुरमुरा येथे राहणारे शहीद वीर जवान किशोर बोबाटे यांचे कुटुंबियांनी व गावातील तरुण मंडळींनी एकत्र येत शहीद वीर जवान किशोर बोबाटे यांचे स्मृती पित्यर्थ रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. याठिकाणी मा. पोलीस अधीक्षक, श्री. शैलेश बलकवडे सा़े. यांनी भेट देत या जवानांच्या कुटुंबियांचे व गावातील तरुणांचे कौतुक केले.





सौंदर्य वस्तुत नसुन पाहणाऱ्याच्या दृष्टीत आहे.
विजय त्याचाच